क्र. ई-१/ रे यां -पोउपनि बि.सं.(अभि) /पदोन्नती / २०१५/6062
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश म.राज्य पुणे ८
यांचे कार्यालय.दिनांक : -20 / ०७ / २०१५

विषय : - पोलीस बिनतारी संदेश विभागातील सहाय्यक पोलीस उप निरीक्षक ( रेडियो यांत्रिकी ) यांना पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश (अभि.) या पदावरील पदोन्नतीवर नेमणूक देणे बाबत.

आदेश :-

पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमूद केलेल्या सहाय्यक पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश ( रेडियो यांत्रिकी ) यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांनी कार्यभार ग्रहण केल्याच्या तारखेपासून पोलीस उप निरीक्षक बि संदेश ( अभियांत्रिकी ) या पदावर स्थानापन्न व तात्पुरती ( provisional ) पदोन्नती देऊन नेमणूक देण्यात येत आहे.

**सहा. पो.उपनि बि.सं.(रेडियो यांत्रिकी) - वेतन बॅन्ड पीबी-१ रु.५२०० - २०२००+ ग्रेड पे २८००**
**पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश (अभि.) वेतन बॅन्ड पीबी-२ रु.९३००- ३४८०० + ग्रेड पे ४३००**

| अ. क्र. | सपोउनि (रे यां. ) यांचे नांव व जात प्रवर्ग | सध्याची नेमणूक व आस्थापना | पदोन्नतीवरील नेमणूकीचे ठिकाण व आस्थापना | पदोन्नती कोणत्या प्रवर्गातून | शेरा. |
|---|---|---|---|---|---|
| १ | बेंद्रे सुधीर गोपाळराव **( खुला प्रवर्ग )** | **मुंबई शहर** पोलीस उप आयुक्त, बि सं वि मुंबई | **मुंबई शहर** पोलीस उप आयुक्त, बि सं वि मुंबई | **खुल्या प्रवर्गातून** | रिक्त पदावर |
| २ | हजारी जयराजसिंग पदमसिंग **( वि जा अ प्रवर्ग )** | **जळगाव** पोलीस अधीक्षक जळगाव | **बुलढाणा** पोलीस अधीक्षक बुलढाणा | **वि जा अ प्रवर्गातून** | रिक्त पदावर |
| ३ | लंभाते शंकर विठोबाजी **( अनु जमाती प्रवर्ग)** | **नागपूर शहर** पोलीस आयुक्त नागपूर शहर | **नागपूर परिक्षेत्र** पोलीस अधीक्षक बि सं , पूर्व विभाग, नागपूर | **अनु जमाती प्रवर्गातून** | रिक्त पदावर |
| ४ | गेडाम किशोर शिवचरण **(अनु जमाती प्रवर्ग )** | **चंद्रपूर** पोलीस अधीक्षक चंद्रपूर | **गडचिरोली** पोलीस अधीक्षक गडचिरोली | **अनु जमाती प्रवर्गातून** | रिक्त पदावर |
| ५ | खोब्रागडे पंकज गुलाबराव **(अनु जमाती प्रवर्ग )** | **नागपूर परिक्षेत्र** पोलीस अधीक्षक बि सं , पूर्व विभाग, नागपूर | **अहमदनगर** पोलीस अधीक्षक अहमदनगर | **अनु जमाती प्रवर्गातून** | रिक्त पदावर |
| ६ | भुसारे गणेश जयवंतराव **(अनु जमाती प्रवर्ग )** | **नांदेड** पोलीस अधीक्षक नांदेड | **औरंगाबाद शहर** पोलीस अधीक्षक औरंगाबाद शहर | **अनु जमाती प्रवर्गातून** | रिक्त पदावर |

| अ. क्र. | सपोउनि (रे यां. ) यांचे नांव व जात प्रवर्ग | सध्याची नेमणूक व आस्थापना | पदोन्नतीवरील नेमणूकीचे ठिकाण व आस्थापना | पदोन्नती कोणत्या प्रवर्गातून | शेरा. |
|---|---|---|---|---|---|
| ७ | कोकणे विलास विठ्ठल (अनु जमाती प्रवर्ग ) | <u>मुंबई शहर</u> पोलीस उप आयुक्त, बि संदेश मुंबई | <u>गट क्र ०७ दौंड</u> समादेशक रा रा पो बल ,गट क्र ०७, दौंड जि पुणे | अनु जमाती प्रवर्गातून | रिक्त पदावर |

२/- उपरोक्त कर्मचा-या विरुध्द विभागीय चौकशी / कोर्ट केस / अन्य चौकशी चालू असेल किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर, शिक्षेची अंमलबजावणी होणेसाठी पदोन्नतीच्या उच्च पदावर ते शिक्षा भोगण्यास तयार असल्याबाबत लेखी संमती पत्र संबंधित घटक प्रमुखांनी त्यांचेकडून त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करणे पूर्वी घ्यावे. जर त्यांनी लेखी संमती देण्याचे नाकारल्यास तसे या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे.

३/- उपरोक्त अ क्र ०२ जे पी हजारी, अ क्र ०३ एस व्ही लंभाते आणि अ क्र ०५ पी जी खोब्रागडे यांनी जात वैधता प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत . त्यांना त्यांचे सेवाज्येष्ठतेनुसार त्यांचे जात प्रवर्गातून , मा पोलीस महासंचालक,म रा, मुंबई यांचे परिपत्रक जा क्र पोमसं/१४-अ/ ६७/एम एन /१२९/२०१४ दि. ०१/०९/२०१४ मधील निर्देशाप्रमाणे तसेच शासनाने मा सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले विशेष हक्क याचिका क्र ३३३५६/२०११ ते ३३३७०/२०११ चे निर्णयाचे अधीन राहून ,त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र दिले नसतानाही तात्पुरते पदोन्नतीसाठी पात्र ठरविलेले आहे. त्यांनी अदयापही त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही ते त्यांनी ०६ महिनेचे आत सादर करावे. त्यांची पदोन्नती ही निव्वळ तात्पुरते स्वरुपाची असून, **<u>त्यांची पदोन्नती प्रशासकीय कारणास्तव कधीही रदद करणेत येईल याची त्यांना लेखी समज दयावी</u>** व तसा पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करुन त्यानंतरच त्यांना पदोन्नतीवर बदलीसाठी मोकळीक करणेत यावी.

४/- सदरच्या पदोन्नतीवरील नेमणूक मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित रिट पिटीशन क्रमांक ८४५२/०४ मधील अंतिम निकालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५/- पदोन्नती नंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढीनंतर वेतन निश्चितीकरिता द्यावयाच्या विकल्पासंबंधी शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक वेपूर १२९८ / प्रक्र - १३ / ९८ / सेवा -१० दि.१० / १२ / ९८ च्या आदेशाची माहिती पो उप निरीक्षक बि सं ( अभि ) या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचा-यास द्यावी. असा विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत असा विकल्प द्यावा. मुदतीत विकल्प न आल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व त्यांची वेतननिश्चिती म.ना.से.(वेतन ) नियम - १९८१, नियम क्र.११(एक) (ए) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधितांस समज द्यावी.

६/- कालबध्द पदोन्नती घेतलेल्या कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदावरील वेतन निश्चिती अनुज्ञेय असणार नाही. कालबध्द पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांपैकी जे कर्मचारी पदोन्नती स्विकारण्यास तयार नसतील त्यांची कालबध्द पदोन्नती ( वरिष्ठ वेतन श्रेणी ) काढून घेण्यात यावी. त्याप्रमाणे अहवाल सादर करावा.

७/- सदरची नियुक्ती महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार करण्यात येत आहे

८/- उपरोक्त पदोन्नती झालेल्या सपोउनिबिसं ( रेडियो यांत्रिकी ) यांना पदोन्नतीच्या / बदलीच्या ठिकाणी कार्यमुक्त करुन त्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक व पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश (अभियांत्रिकी ) या पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक या कार्यालयास उलट टपाली कळवावा. तसेच सदरील कर्मचारी हे पदोन्नतीवर बदली झालेले ठिकाणी या आदेशाचे तारखेनंतर एक महिन्याचे आत हजर न झाल्यास त्यांची सेवाज्येष्ठता ते पदोन्नतीवर हजर होतील त्या दिनांकापासून धरणेत येईल तसेच संबंधित आस्थापना अधिकारी यांनी पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांच्या सेवापुस्तकामध्ये पदोन्नतीच्या आदेशाचा क्रमांक व दिनांकाची नोंद घ्यावी.

९/- पोलीस बिनतारी संदेश विभागातर्फे पदोन्नत अधिकारी यांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा देणेत येत आहेत.

(अमन नाथ )
अपर पोलीस महासंचालक व संचालक
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य,
पुणे

प्रति ,

पोलीस आयुक्त, मुंबई शहर/ नागपूर शहर/ औरंगाबाद शहर
पोलीस अधिक्षक, जळगांव /चंद्रपूर /नांदेड/ बुलढाणा/ गडचिरोली/अहमदनगर
समादेशक रा रा पो बल गट क्र ७, दौंड, जि पुणे
पो अधीक्षक, बि सं, पूर्व विभाग नागपूर / पश्चिम विभाग पुणे
पोलीस उप आयुक्त बिनतारी संदेश, मुंबई

प्रत सादर - पोलीस महासंचालक, म रा, मुंबई (लक्षवेध का क्र ५ अ )

प्रत

सहा पोलीस आयुक्त, बि सं नागपूर शहर
पोलीस उप अधीक्षक बि सं नागपूर परिक्षेत्र/ औरंगाबाद परिक्षेत्र/ नाशिक परिक्षेत्र/ नांदेड परिक्षेत्र/ अमरावती परिक्षेत्र
पोलीस निरिक्षक बि सं जळगांव /चंद्रपूर /नांदेड/ बुलढाणा/ गडचिरोली/अहमदनगर / ग्रुट क्र ७, दौंड, जि पुणे

**स्थानिक प्रती :-**

पोलीस अधिक्षक बिनतारी संदेश, मुख्यालय, पुणे.
कार्यालय अधिक्षक / स्वीय सहाय्यक / लघुलेखक / प्रमुख लिपिक आस्थापना शाखा - १ व २/ ई-८ लिपीक/ भरती कक्ष / क'शाखा/ 'फ' शाखा / नियोजन कक्ष/ लेखाशाखा/ आदेश फाईल